।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

25 1994-2019 SILVER JUBILEE YEAR

Phone : (02462) 229242 NATONAL SERVICE SCHEME DEPARTMENTS

Fax : (02462) 229574 Website: wwwsrtmun.ac.in E-mail: srtmunss2018@gmail.com


जा.क्र. : रासेयो/२०१८–१९/127 दिनांक : २७.०७.२०१९

स्मरणपत्र १.

प्रति,

मा.प्राचार्य / रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,

रा.से.यो. राबविणारे सर्व संलग्नित महाविद्यालय,

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड.

विषय:– रा.से.यो. वार्षिक खर्चाच्या अंकेक्षणासह तात्काळ वार्षिक लेखे व अहवाल सादर करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांतर्गत आपल्या महाविद्यालच्या रा.से.यो. विभागाच्या वतीने सन २०१८–१९ अंतर्गत नियमित व विशेष शिबीराच्या खर्चाचे वार्षिक अंकेक्षण केंद्रीय पध्दतीने करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्यानुसार जिल्हानिहाय अंकेक्षणाचा कार्यक्रम दि. ०६ जुलै ते दि. ०९ जुलै २०१९ या कालावधीत आयोजीत करण्यात आलेले होता.

त्याअनुशंगाने आपल्या रा.से.यो. पथकाकडून झालेल्या खर्चाचे अंकेक्षण विद्यापीठाचे सनदी लेखापाल श्री. प्रविण पाटील यांच्याकडून करून वार्षिक लेखे व अहवाल दि. १९ जुलै २०१९ पूर्वी विद्यापीठ रा.से.यो. विभागात सादर करण्यास आपणास यापूर्वी कळविण्यात आलेले होते परंतु आपल्या महाविद्यालयाचे वार्षिक लेखे व अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. विद्यापीठाचे रा.से.यो. अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र शासनाकडे पाठविण्यास उशीर होत असून अहवाल पाठविण्यास उशीर झाल्यास अनुदान मिळण्यास अडचणी निर्माण होवू शकतात.

तरी आपणास पुनश्च विनंती करण्यात येते आपण दि. ३१/०७/२०१९ पूर्वी आपले रा.से.यो. वार्षिक लेखे व अहवाल विद्यापीठ रा.से.यो. विभागात सादर करावे अन्यथा दिलेल्या दिनांकानंतर आपले वार्षिक लेखे व अहवाल स्विकारले जाणार नाहीत याची सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. कृपया नोंद घ्यावी. ही विनंती.

संचालक

डॉ. शिवराज बोकडे

(रा.से.यो.विभागप्रस्तुत विद्यापीठ)

याची प्रत:–

१) मा.कुलसचिव, प्रस्तूत विद्यापीठ.

२) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक सहाय्यता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

Scanned by CamScanner